सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२२/दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/४५५ दिनांक :०१/०६/२०२२

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम प्रवेशासाठीचे वेळापत्रक

महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) दि ०५ जुलै, २०१८ मध्ये प्रकाशीत केलेल्या अधिसूचना क्र. २३२ ला अनुसरून, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/(प्र.क्र.०६/१९)/तांशि-५ दि. ०६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेशी संबंधीत बाबीची अंमलबजावणी करण्याकरीता संचालक, तंत्रशिक्षण हे सक्षम प्राधिकारी आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता तीन वर्ष कालावधीच्या, पुर्णवेळ पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे आणि अर्ज निश्चित करणे या प्रक्रियेच्या माहितीसाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

कोविड -१९ चा प्रादुर्भाव व सामाजिक अंतर (सोशल डिस्टंसिंग) राखण्याची आवश्यकता ई. बाबींचा विचार करता, सदर पदविका प्रवेशासाठी नियुक्त केलेल्या सुविधा केंद्रांवर (एफसी) इच्छुक उमेदवार आणि पालकांची गर्दी टाळणे आवश्यक आहे.

सदर बाबींचा विचार करता, सक्षम प्राधिकरण, कागदपत्रांच्या प्रत्यक्ष छाननी प्रक्रियेव्यतिरिक्त ई-स्क्रूटनीची प्रक्रिया उपलब्ध करून देणार आहे. ऑनलाईन अर्ज भरणे व निश्चित करणे याकरिता उमेदवार त्यांच्या सोयीनुसार छाननीची पद्धत/पर्याय निवडू शकतील.

- **पर्याय १** :- उमेदवार ऑनलाईन नोंदणी करून “ई-स्क्रूटनी” पद्धतीचा पर्याय निवडू शकतील. या पद्धतीमध्ये उमेदवार कोणत्याही ठिकाणावरून इंटरनेटशी जोडलेल्या संगणक/ स्मार्टफोन द्वारे ऑनलाईन अर्ज भरतील आणि सबमिट करतील व आवश्यक कागदपत्रे अपलोड करतील तसेच उमेदवाराला अर्जाच्या पडताळणीसाठी व निश्चितीसाठी कोठेही प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता नाही. उमेदवाराचा अर्ज व कागदपत्रे सुविधा केंद्राद्वारे ( एफसी द्वारे) पडताळले जातील व निश्चित केले जातील.
- **पर्याय २** : - उमेदवार मोबाईलवरून (स्मार्टफोन) अथवा संगणकावरून ऑनलाईन नोंदणी करून “प्रत्यक्ष स्क्रूटनी” पद्धतीचा पर्याय निवडू शकतील. ज्या उमेदवारांकडे संगणक अथवा मोबाईल (स्मार्टफोन) इत्यादी सुविधा नाहीत असे उमेदवार त्यांच्या सर्वात जवळील सुविधा केंद्रावर जाऊन ऑनलाईन नोंदणी व सोयीस्कर वेळ ठरवण्यासाठी जाऊ शकतील. अश्याप्रकारे ऑनलाईन नोंदणी झालेले उमेदवार पुढील प्रक्रियेसाठी सुविधा केंद्राची तारीख व वेळ ठरवून घेतील . उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणे, स्कॅन करुन आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे इत्यादी प्रक्रिया सुविधा केंद्रावर स्वतः निशुल्कपणे करू शकतील. उमेदवारांनी त्यांना नेमून दिलेल्या वेळेत सुविधा केंद्रावर उपस्थित राहून व सामाजिक अंतर नियमांचे पालन करून अर्ज पडताळणी व त्याची निश्चित करणे अशा प्रक्रिया निशुल्क पार पाडाव्यात .

इच्छुक उमेदवारांनी माहिती पुस्तिकेमध्ये दिलेले नियम, प्रक्रिया आणि सूचना यांचे काळजीपूर्वक वाचन करावे. माहिती पुस्तिका https://poly22.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर डाउनलोड करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

| प्रवेशासाठी पात्रतेचे निकष |
|---|
| **महाराष्ट्र राज्य/ जम्मू -काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील स्थलांतरित/ अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार** |
| (एक) उमेदवार भारतीय नागरीक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने किमान ३५ टक्के एवढया गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र, एसएससी/ इयत्ता १० वी परीक्षा किंवा तिच्याशी समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केली असली पाहिजे.<br>टीप: महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार अखिल भारतीय उमेदवार म्हणून केवळ संस्थास्तरावरील जागांसाठी पात्र असतील. |

NRI/OCI/PIO/CIWGC/FN उमेदवार- शै. व. २०२२-२३ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीईने) प्रवेशासाठी संचालनालयाच्या कक्षेत असलेल्या संस्थांना या कोट्यासाठी कोणतीही जागा मंजूर केलेली नाही. (संचालनालयाचे संकेतस्थळ वेळोवेळी पहावे.)

महत्वाची टीप:

१. ज्या उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य मंडळाच्या मार्च-एप्रिल २०२२ इयत्ता १० वी/एसएससी परीक्षेकरिता नोंदणी केलेली आहे, अशा उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता तपशिलामध्ये स्वतःचा परीक्षा आसन (सीट) क्रमांक भरावा आणि विहित शुल्क भरून अर्ज पूर्ण करावेत.
२. उमेदवाराने महाराष्ट्र राज्य मंडळाच्या मार्च-एप्रिल २०२२ इयत्ता १० वी/एसएससी परीक्षेत प्राप्त केलेले गुण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून (एमएसबीएसएचएसई) प्राप्त होणाऱ्या निकालाच्या माहितीवरुन थेट घेण्यात येतील आणि ते संबधित विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये दर्शविण्यात येतील.
३. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (एमएसबीएसएचएसई) मार्च-एप्रिल २०२२ च्या इयत्ता १० वी/ एसएससी निकालाच्या घोषणेनंतर उमेदवारांनी त्याच्या/तिच्या अर्जामध्ये दर्शविण्यात आलेल्या गुणांची पडताळणी करावी आणि दर्शविलेल्या गुणांमध्ये काही तफावत असल्यास उमेदवाराने आवश्यक दुरुस्तीबद्दल ई-स्क्रूटनी पध्दतीद्वारे किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीद्वारे तक्रार नोंदवावी. जर गुणांच्या तफावतीबाबत नोंदविण्यात आलेली तक्रार योग्य आढळल्यासखिद्ध गुणांमध्ये सुधारणा करण्यात येईल.
४. सीबीएसई आणि आयसीएसई मंडळाकडून दहावीच्या मार्च-एप्रिल २०२२ च्या परीक्षेस नोंदणी केलेल्या उमेदवारांनी संबंधित बोर्डाकडून निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांनी त्यांची शैक्षणिक पात्रता तपशील भरावेत आणि अर्ज पूर्ण करावेत.
५. ज्या उमेदवारांनी २०२२ पूर्वी इयत्ता १० वी/एसएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे अश्या उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता तपशिलासह व आवश्यक कागदपत्रे अपलोड करून तसेच आवश्यक शुल्कासह संपूर्ण अर्ज भरावा.
६. राज्य मंडळ / आयसीएसई आणि सीबीएसई उमेदवारांसाठी माहिती पुस्तिकेमध्ये "एकूण गुण" ही संज्ञा स्वतंत्रपणे परिभाषित केली गेली आहे.
७. उमेदवारांच्या निकालांमध्ये अक्षरी ग्रेड वाटप केले असल्यास अशा उमेदवाराने अर्ज सादर करतानाच्या वेळी संबंधित सक्षम प्राधिकरण किंवा बोर्डाकडून अक्षरी ग्रेडचे समकक्ष गुणांमध्ये रूपांतरणाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. या समकक्ष गुणांच्या आधारे पात्रतेचा निर्णय केला जाईल.

## प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी:-

१. उमेदवारांनी वेळापत्रकानुसार **https://poly22.dte.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत.
२. ऑनलाईन पद्धतीने क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड /UPI/नेट बँकिंगद्वारे उमेदवारांना खाली नमूद केलेले अर्ज शुल्क भरणे आवश्यक आहे. (कोणत्याही अन्य पद्धतीने शुल्क भरण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही) भरलेले अर्ज शुल्क ना - परतावा पद्धतीचे आहे.

| | |
|---|---|
| महाराष्ट्र राज्यातील सर्वसाधारण प्रवर्ग, महाराष्ट्र राज्याबाहेरील (OMS), जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधून विस्थापित उमेदवार | ₹ ४००/- |
| फक्त महाराष्ट्र राज्यातील राखीव प्रवर्ग उमेदवार [SC, ST, VJ/DT- NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC, EWS] आणि दिव्यांग उमेदवार | ₹ ३००/- |

**महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी प्रवेश प्रक्रियेचे टप्पे आणि नियोजित तारखा खालीलप्रमाणे आहेत.**

| अनु. | प्रक्रिया | वेळापत्रक | |
|---|---|---|---|
| | | पहिली तारीख | अंतिम तारीख |
| १. | **प्रवेशप्रक्रियेसाठी उमेदवारांद्वारे संकेतस्थळावरुन अर्ज छाननीची योग्य पद्धत निवड करुन ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे**<br>(महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी) | ०२-०६-२०२२ | ३०*-०६-२०२२ |
| २. | **प्रवेशासाठी कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज भरल्याची निश्चिती करणे**<br>**अ) ई-स्क्रूटनी पध्दत निवडलेल्या उमेदवारांसाठी:**<br>१. असे उमेदवार कोणत्याही ठिकाणावरून इंटरनेटशी जोडलेल्या स्मार्टफोन/ संगणकावरून ऑनलाईन अर्ज भरतील व आवश्यक कागदपत्रे अपलोड करतील.<br>२. अशा उमेदवारांना अर्जाच्या पडताळणीसाठी व निश्चितीसाठी सुविधा केंद्रावर (एफसी) प्रत्यक्ष जाण्याची गरज नाही. उमेदवाराचा अर्ज व कागदपत्रे ई-स्क्रूटनी पद्धतीद्वारे सुविधा केंद्राद्वारे (एफसी) पडताळले जातील व निश्चित केले जातील.<br>३. अशा उमेदवारांच्या अर्जाची ई-स्क्रूटनी दरम्यान:<br>• कोणतीही त्रुटी आढळली नाही तर: अर्जाची पडताळणी व निश्चितीची स्थिती उमेदवारास त्याच्या लॉग इन मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच पोचपावतीदेखील उपलब्ध असेल.<br>• त्रुटी आढळली तर: उमेदवाराच्या लॉग इन मध्ये अर्ज परत पाठवून त्रुटींचे तपशील उमेदवारांना कळवून ते दुरुस्तीसाठी सूचित केले जाईल. | ०२-०६-२०२२ | ३०*-०६-२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | • उमेदवाराने परत पाठविण्यात आलेला अर्ज दुरुस्त करावा व ई-स्क्रूटनीसाठी उमेदवाराच्या लॉग इन द्वारे पुन्हा सबमिट करावा.<br>**ब) प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडलेल्या उमेदवारांसाठी:**<br>१.अशा उमेदवारांनी त्याने/तिने निवड केलेल्या सुविधा केंद्रावर (एफसी) नेमून दिलेल्या वेळेत तेथे जाऊन, ऑनलाईन अर्ज भरणे, स्कॅन करुन आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज पडताळणी करणे व निश्चित करणे अशा प्रक्रिया करण्याकरिता उपस्थित रहावे.<br>२.अर्जाची पडताळणी व निश्चिती केल्यानंतर सुविधा केंद्र (एफसी) पोच पावती देईल.<br>३.अर्जांची निश्चितीची स्थिती उमेदवारास लॉग इन मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच पोचपावतीदेखील उपलब्ध असेल. | | |
| * प्रवेशप्रक्रियेच्या कॅप व्यतिरिक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कट ऑफ डेट पर्यंत) सुरू ठेवल्या जातील. दि. ३०-०६-२०२२ नंतर ई-स्क्रूटनी पद्धतीद्वारे किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पद्धतीद्वारे नोंद होणारे, पडताळणी व निश्चित होणारे अर्ज संस्था स्तरावरील व कॅपव्यतिरिक्त जागांसाठीच विचारात घेतले जातील. | | | |
| ३. | महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी संकेतस्थळावर **तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे** | ०३-०७-२०२२ | |
| ४. | **सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी: तात्पुरत्या गुणवत्ता याद्यामध्ये तक्रार असल्यास, त्या सादर करणे:**<br>**अ) ई-स्क्रूटनी पध्दत निवडलेल्या उमेदवारांसाठी:**<br>• उमेदवाराने त्याच्या/तिच्या लॉग-इनद्वारे प्रदर्शित झालेल्या तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये दर्शविलेल्या माहितीमध्ये आवश्यक दुरुस्तीबद्दल तक्रार नोंदवावी.<br>• अश्या उमेदवारांचे अर्ज त्यांच्या लॉग इन मध्ये दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात येतील.<br>• कोणत्याही दुरुस्ती / सवलतीच्या दाव्यासाठी उमेदवार आवश्यक कागदपत्रे अपलोड करू शकतात.<br>• उमेदवाराने नोंद केलेल्या तक्रारीची स्वीकृतीबाबतची/नाकारण्याबाबतची स्थिती तसेच अद्ययावत पोचपावती उमेदवारांना लॉगिनमध्ये उपलब्ध असेल.<br>**ब) प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडलेल्या उमेदवारांसाठी:**<br>• उमेदवाराने प्रदर्शित झालेल्या तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये दर्शविलेल्या माहितीमध्ये आवश्यक दुरुस्तीबद्दल, जेथे त्याने/तिने यापूर्वी अर्जाची निश्चिती केली होती त्याच सुविधा केंद्रात जाऊन तक्रार नोंदवावी.<br>• उमेदवार सुविधा केंद्रात कोणत्याही दुरुस्ती / सवलतीसाठी हक्क सांगण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करू शकतात.<br>• सुविधा केंद्र (एफसी) उमेदवाराला नवीन पोच पावती देईल. | ०४-०७-२०२२ | ०६-०७-२०२२ |
| ५. | महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी संकेतस्थळावर **अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे** | ०७-०७-२०२२ | |

**महत्वाची टीप:-**

१. कॅप जागांअंतर्गत प्रवेशासाठी इच्छुक **सर्व प्रकारच्या उमेदवारांनी** ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा पात्र नोंदणीकृत उमेदवारांना कॅप गुणवत्तेसाठी आणि कॅपद्वारे प्रवेशासाठी विचारात घेतले जाईल.

२. संस्थास्तरावरील कोट्यामधे व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांत प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.

## उमेदवारांना महत्वाच्या सूचना:

१. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडणारे उमेदवार महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या कोविड -१९ च्या संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करतील. नियुक्त केलेल्या सुविधा केंद्रांवर सामाजिक अंतर राखणे तसेच त्या ठिकाणी इच्छुक उमेदवार व पालकांची गर्दी टाळणे अत्यंत आवश्यक आहे.

२. जर उमेदवार ऑनलाईन भरलेल्या अर्जाची त्याने निवड केलेल्या ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे अर्ज निश्चित करण्यास अपयशी ठरले तर असे अर्ज नाकारले जातील आणि अशा उमेदवारांची नावे प्रवेश प्रक्रियेसाठी तयार करण्यात येणाऱ्या कॅप तसेच नॉन-कॅप अशा दोन्ही प्रकारच्या गुणवत्ता यादींमध्ये दिसणार नाहीत.

३. उमेदवाराने निवड केलेल्या ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी, मागासवर्गीय उमेदवार ( VJ/DT- NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC) या प्रवर्गातील ३१ मार्च २०२३ पर्यंत वैध असलेले नॉन-क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करतील. जर हे उमेदवार नॉन-क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत तर अशा उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार मानले जाईल आणि अशा उमेदवारांना प्रवेश प्रक्रियेअंतर्गत राखीव जागांवर दावा करता येणार नाही.

४. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रवर्गातील उमेदवार त्यांनी निवड केलेल्या ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पात्रता प्रमाणपत्र (३१ मार्च २०२३ पर्यंत वैध असलेले) सादर करतील. जर हे उमेदवार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे पात्रता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत तर अशा उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार मानले जाईल आणि अशा उमेदवारांना प्रवेश प्रक्रियेअंतर्गत राखीव जागांवर दावा करता येणार नाही.

५. ई-स्क्रूटनी पध्दतीच्या किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या वेळी, उमेदवार अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी सुसंगत आणि वैध कागदपत्रे सादर करतील. संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास, उमेदवार अर्जात केलेले असे दावे गमावतील आणि अशा दाव्यांचा विचार न करता अशा उमेदवारांच्या अर्जांची निश्चिती केली जाईल.

६. राखीव प्रवर्गाचे उमेदवार म्हणून नोंदणी केलेले परंतु ई-स्क्रूटनी पध्दतीच्या किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या कागदपत्रांच्या पडताळणीच्या टप्प्यात, राखीव प्रवर्गाच्या दाव्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ असलेल्या उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार समजले जाईल व त्याना ₹ १०० /- चे शुल्क फरकाची रक्कम फक्त ऑनलाईन पद्धतीने भरावे लागेल.

७. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडणारे उमेदवारांना सुविधा केंद्रावर कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे सादर करावी लागतील.

८. कॅपच्या विविध फेरींकरिता विकल्प अर्ज (ऑपशन फॉर्म) भरणे, कॅप जागावाटप, जागास्वीकृती करणे, उमेदवाराने वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इत्यादींबाबतचे पुढील वेळापत्रक अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर घोषित केले जाईल आणि ते **https://poly22.dte.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

## सर्वसाधारण टिप:

१. ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीचा पर्याय निवडला आहे असे उमेदवार सुविधा केंद्रात उपलब्ध असलेल्या आयटी सुविधेचा वापर करून त्यांचे अर्ज भरणे, स्कॅनिंग करणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या कामाकरिता विनाशुल्क लाभ घेऊ शकतात. उमेदवार सुविधाकेंद्रांवर (एफसी) उपस्थित असताना, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या कोविड -१९ च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करतील.

२. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीसाठी : सुविधाकेंद्रांची (एफसीची) यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि ही सुविधाकेंद्रे नियोजित काळात सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

३. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

४. वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामधे अपरिहार्य स्थितीमधे बदल संभवु शकतो. जर, सुधारित वेळापत्रक घोषित झाले तर ते **https://poly22.dte.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. अधिक माहितीकरिता संकेतस्थळावर अथवा संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

५. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

६. चौकशी करिता व आयटी सुविधे करिता जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधावा.

७. मदतकक्ष क्रमांक **८६९८७८१६६९, ८६९८७४२३६०** सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई